# लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालय,

# महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची

# नागरिकांची सनद

१. स्कॅन्डीनेव्हीयन देशातील ऑम्बुडस्मन संस्थेवर आधारित लोक आयुक्त व लोकपाल संस्थेच्या संकल्पनेची शिफारस प्रशासकीय सुधारणा आयोगाने ऑक्टोबर, १९६६ मध्ये केली. सदर आयोगाने, नागरिकांच्या शासनाविरुध्दच्या गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यास तत्कालीन व्यवस्था अपुरी पडत असल्याचे आपल्या अंतरिम अहवालात नमूद केले आहे. तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार, लोकांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यातील अकार्यक्षमता व टाळाटाळ यामुळे जनतेमध्ये जो असंतोष निर्माण होतो तो दूर करण्यासाठी व त्यांच्या तक्रारींवर, सत्वर उपाय मिळवून देण्यासाठी तसेच लोकांमध्ये प्रशासकीय सेवेच्या सचोटीबद्दल व कार्यक्षमतेबद्दल विश्वास निर्माण करण्यासाठी राज्य पातळीवर लोक आयुक्तांची व केंद्रीय पातळीवर लोकपालांची आवश्यकता प्रशासकीय सुधारणा आयोगास भासली.

२. लोक आयुक्त संस्थेची स्थापना करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून ती स्थापना महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ या अधिनियमाद्वारे करण्यात आली आणि ही संस्था दि.२५ ऑक्टोबर, १९७२ रोजी अस्तित्वात आली.

३. लोक आयुक्तांची नेमणूक, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ति आणि विधानसभेतील विरोधी पक्ष नेता किंवा असा कोणताही नेता नसेल तर, उक्त सभागृहातील विरोधी पक्ष सदस्यांनी, अध्यक्ष निदेश देईल त्या रितीने याबाबतीत निवडलेली व्यक्ती, यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर राज्यपालांकडून करण्यात येते. तसेच उप लोक आयुक्तांची नेमणूक लोक आयुक्तांशी विचारविनिमय केल्यानंतर राज्यपालांकडून करण्यात येते.

४. महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत उच्च न्यायालयातील निवृत्त मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश असलेल्या व्यक्तीची लोक आयुक्त म्हणून व भारतीय प्रशासन सेवेतील राज्यातील मुख्य सचिव वा अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून निवृत्त झालेल्या व्यक्तीची उप लोक आयुक्त म्हणून नेमणूक करण्याची प्रथा आहे.

५. लोक आयुक्त ही स्वतंत्र प्रशासन असलेली व (१) प्रशासकीय गैरकारभारामुळे एखाद्या व्यक्तींवर कोणताही अन्याय झाल्यास त्याचे अन्वेषण करण्याचे, तो दूर करण्याची किंवा प्रशासकीय कार्यपध्दतीमध्ये सुधारणा सुचवून शिफारस करण्याचे अधिकार व (२) लोकसेवकाविरुध्दच्या भ्रष्टाचाराबाबतच्या आणि तो त्याच्या पदाचा गैरवापर करीत असल्याबाबतच्या तक्रारींचे अन्वेषण करण्याचे व योग्य ती शिफारस करण्याचे अधिकार असलेली सांविधिक यंत्रणा आहे.

६. अधिनियमात लोक आयुक्तांची व उप लोक आयुक्तांची कार्ये, अधिकार व अधिकारक्षेत्रे ठरवून दिलेली आहेत. त्यांना स्पष्टपणे नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये कायद्यान्वये कार्य करावे लागते. परंतु, याबाबत अज्ञानी असलेले अधिकांश लोक, त्यांना प्रशासनातील सर्व वाईट गोष्टींवरील रामबाण उपाय समजतात. त्यामुळे ज्यांची दखल घेता येणार नाही अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर या कार्यालयाकडे येत आहेत. अनेक तक्रारदार, त्यांनी विविध शासकीय कार्यालयांकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, या कार्यालयाकडून संबंधीत प्रकरणी दखल घेतली जाईल या समजुतीपोटी, या कार्यालयाकडे पाठवतात. अर्थात या कार्यालयाच्या अधिकारक्षेत्राविषयी लोकांना अधिक जागृत करता आले, तर ते या कार्यालयाला सहाय्यकारीच ठरू शकेल आणि त्यामुळे ज्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही करणे शक्य नाही अशा तक्रारी पाठविण्याचा लोकांचा त्रास तर वाचेलच; परंतु त्याचबरोबर तक्रारदाराच्या मनात या कार्यालयाकडून पूर्ण होऊ न शकणाऱ्या अपेक्षा निर्माण होणार नाहीत आणि त्यामुळे त्यांच्या मनात वैफल्याची व निराशेची भावना निर्माण होणार नाही.

७. **लोक आयुक्तांचे अधिकारक्षेत्र** - लोक आयुक्तांचे अधिकारक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर आहे. लोक आयुक्तांना, सर्व मंत्री म्हणजेच महाराष्ट्र राज्याच्या मंत्री परिषदेचे (मुख्यमंत्र्यांव्यतिरिक्त) सदस्य, शासनाचे सचिव, जिल्हा

परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य, पंचायत समितीचे सभापती, उप सभापती व सदस्य आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती, तसेच नगरपालिकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती, मुंबई महानगरपालिका अधिनियम, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये स्थापन केलेल्या सर्व महानगरपालिकांचे महापौर, उप महापौर, आणि महानगरपालिका सदस्य आणि स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचे सभापती अशा लोकसेवकांनी केलेल्या किंवा त्यांच्या सर्वसाधारण किंवा विशिष्ट मान्यतेसह करण्यात आलेल्या कारवाईविरुध्द गाऱ्हाणे किंवा अभिकथन असलेल्या तक्रारीचे अन्वेषण व चौकशी करण्याचे अधिकार आहेत. याव्यतिरिक्त खालील परिच्छेद १२ मध्ये उल्लेखिलेल्या इतर सर्व लोकसेवकांविरुध्द अन्वेषण व चौकशी करण्याचा अधिकारदेखील लोक आयुक्तांना आहेच.

८. **उप लोक आयुक्तांचे अधिकारक्षेत्र** - उप लोक आयुक्तांचे अधिकारक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर आहे. परंतु, उप लोक आयुक्तांना सर्व मंत्री, शासनाचे सचिव, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य, पंचायत समितीचे सभापती, उप सभापती व सदस्य आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती, नगरपालिकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती, मुंबई महानगरपालिका अधिनियम, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये स्थापन केलेल्या सर्व महानगरपालिकांचे महापौर, उप महापौर, आणि महानगरपालिका सदस्य आणि स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचे सभापती असे लोकसेवक वगळून उर्वरित कोणत्याही लोकसेवकाने केलेल्या किंवा त्यांच्या सर्वासाधारण किंवा विशिष्ट मान्यतेसह करण्यात आलेल्या कारवाईविरुध्द गाऱ्हाणे किंवा अभिकथन असलेल्या तक्रारीचे अन्वेषण व चौकशी करण्याचे अधिकार आहेत.

९. **कुप्रशासनाची व्याख्या** - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम २(ग) नुसार "कुप्रशासन" ह्या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे:-

(ग) "कुप्रशासन" म्हणजे पुढीलपैकी कोणत्याही बाबतीत प्रशासकीय कामे पार पाडताना केलेली किंवा केल्याचे दिसून येणारी पुढील प्रकारची कारवाई होय :-

(एक) ज्या बाबतीत अशी कारवाई किंवा अशा कारवाईचे नियमन करणारी प्रशासकीय कार्यपध्दती किंवा प्रथा ही अवाजवी, अन्यायी, जुलमी किंवा अनुचित भेदभाव करणारी असेल; किंवा

(दोन) ज्या बाबतीत अशी कारवाई करण्यामध्ये हयगय किंवा अकारण विलंब झाला असेल किंवा अशा कारवाईचे नियमन करणाऱ्या प्रशासकीय कार्यपध्दतीमुळे किंवा प्रथेमुळे अकारण विलंब झाल असेल.

१०. **अभिकथनाची व्याख्या** - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम २(ब) नुसार "अभिकथन" या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे:-

(ब) लोकसेवकांच्या संबंधात "अभिकथन" म्हणजे अशा लोकसेवकाने,

(एक) स्वतःच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही फायद्यासाठी किंवा अनुग्रहासाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीची अकारण हानी करण्यासाठी किंवा तिला त्रास देण्यासाठी म्हणून, लोकसेवक म्हणून असलेल्या आपल्या हुद्याचा दुरुपयोग केला आहे;

(दोन) लोकसेवक म्हणून असलेली आपली कामे पार पाडताना, व्यक्तिगत हितासाठी किंवा अनुचित वा भ्रष्ट हेतूने तो प्रवृत्त झाला होता; किंवा

(तीन) भ्रष्टाचाराबद्दल तो दोषी आहे किंवा लोकसेवक या नात्याने आवश्यक असलेली सचोटी त्याच्याजवळ नाही;

अशा अर्थाचे दृढकथन.

११. **गाऱ्हाण्याची व्याख्या** - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम २(ड) नुसार “गाऱ्हाणे” या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे:-

**(ड)** “गाऱ्हाणे” म्हणजे कुप्रशासनाचा परिणाम म्हणून आपल्यावर अन्याय झाला आहे किंवा आपणास अकारण त्रास झाला आहे, असा एखाद्या व्यक्तीने सांगितलेला दावा.

१२. **लोकसेवक** - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ नुसार “लोकसेवक” म्हणजे पुढे दिलेल्या वर्णनांपैकी कोणत्याही वर्णनाची व्यक्ती:-

(१) मुख्यमंत्री वगळता, महाराष्ट्र राज्याच्या मंत्री परिषदेचा सदस्य, ज्यात मंत्री, राज्यमंत्री, उप मंत्री यांचा समावेश होतो.

(२) महाराष्ट्र राज्याच्या कारभाराच्या संबंधातील एखाद्या लोकसेवेत किंवा पदावर नेमलेली अधिकारी व्यक्ती.

(३) (अ) महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य पंचायत समितीचा सभापती, उपसभापती व सदस्य आणि स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती.

(ब) महाराष्ट्रातील नगरपालिकेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष नगर पालिका सदस्य व स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती.

(क) महाराष्ट्रातील महानगरपालिकांचे महापौर, उप महापौर, महानगरपालिका सदस्य आणि स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचे सभापती.

(४) पुढील सेवेत असलेली किंवा त्यांच्याकडून वेतन घेणारी प्रत्येक व्यक्ती:-

(अ) **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेले महाराष्ट्रातील कोणतेही स्थानिक प्राधिकरण (जसे महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या)

(ब) राज्य अधिनियमानुसार प्रस्थापित झालेले राज्य शासनाच्या मालकीचे किंवा राज्य शासनाद्वारे नियंत्रित करण्यात येणारे कोणतेही महामंडळ (यामध्ये महा. राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा समावेश होतो)

(क) जिच्यामधील भरणा झालेल्या भाग-भांडवलाच्या कमीत कमी एकावन्न टक्के भाग भांडवल राज्य शासनाने धारण केलेले असेल अशी, कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ६१७ च्या अर्थानुसार कोणतीही सरकारी कंपनी किंवा जिच्यामधील भरणा झालेल्या भाग भांडवलाच्या कमीत कमी एकावन्न टक्के भाग-भांडवल राज्य शासनाने धारण केले असेल अशा कंपनीची दुय्यम असेल अशी कोणतीही कंपनी.

(ड) जी राज्य शासनाच्या नियंत्रणाधीन असेल आणि जी उक्त शासनाकडून याबाबतीत **शासकीय राजपत्रात** अधिसुचित करण्यात आली असेल अशी, संस्था नोंदणी अधिनियम, १९६० अन्वये नोंदलेली कोणतीही संस्था.

१३. **अधिकारकक्षेच्या मर्यादा** - लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्तांस खाली दिलेल्या गाऱ्हाण्याबाबतच्या तक्रारींवर चौकशी करण्याचे आणि अन्वेषण करण्याचे अधिकार नाहीत :-

(अ) एखाद्या गुन्ह्याचा तपास लावण्याच्या किंवा राज्याची सुरक्षितता जपण्याच्या प्रयोजनार्थ केलेली कारवाई.

(ब) एखादी बाब न्यायालयाकडे पाठवावी किंवा नाही हे ठरविण्यासंबंधीच्या अधिकारांचा वापर करून केलेली कारवाई.

(क) संविदागत आबंधने पूर्ण करण्यास त्रास किंवा अक्षम्य विलंब झाला आहे, असे तक्रार करणाऱ्याचे अभिकथन असेल त्या व्यतिरिक्त प्रशासनाच्या, ग्राहकांशी किंवा पुरवठाकारांशी असलेल्या केवळ वाणिज्यिक संबंधाचे नियमन करणाऱ्या संविदेच्या अटीतून उद्भवतील अशा बाबींच्या संबंधात केलेली कारवाई.

(ड) लोकसेवकांच्या नेमणुका, त्यांना काढून टाकणे, त्यांचे वेतन, शिस्त, त्यांचे नियत सेवावधी किंवा त्यांच्या सेवेच्या शर्ती संबंधीच्या इतर बाबी यासंबंधी केलेली कारवाई, परंतु त्यात निवृत्तीवेतन, उपदान, भविष्य निर्वाह निधी यासंबंधात किंवा सेवानिवृत्ती, काढून टाकणे किंवा सेवासमाप्ती यानंतर उद्भवणाऱ्या कोणत्याही हक्क मागण्या या संबंधातील कारवाईचा समावेश होणार नाही.

(इ) सन्मान चिन्हे व पुरस्कार देणे.

(फ) ज्या कोणत्याही कृतीमध्ये तक्रार करणाऱ्यास, कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा न्यायालयापुढे कार्यवाही दाखल करून कोणतीही उपाययोजना करता येईल किंवा अशी उपाययोजना करता आली असती अशी कार्यवाही.

परंतु, लोक आयुक्तास किंवा उप लोक आयुक्तास अशा व्यक्तीस वाजवी कारणास्तव, अशी उपाययोजना करता आली नाही किंवा करता येत नाही याबद्दल यथास्थिती लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त यांची खात्री झाल्यास तक्रार करणाऱ्यास अशी उपाययोजना करता येईल किंवा करता आली असती तरीही अन्वेषण करता येईल.

त्याचप्रमाणे पुढीलपैकी व्यक्तींनी केलेल्या किंवा त्यांच्या मान्यतेसह केलेल्या कोणत्याही कार्यवाहीचे अन्वेषण करण्याचे अधिकार नाहीत :-

(अ) भारतीय दंड संहितेच्या कलम १९ मध्ये व्याख्या केलेला कोणताही न्यायाधीश

(ब) भारतातील कोणत्याही न्यायालयाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी

(क) महाराष्ट्राचे महालेखापाल.

(ड) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य

(इ) संविधानाच्या अनुच्छेद ३२४ मध्ये निर्दिष्ट केलेले, मुख्य निवडणूक आयुक्त, निवडणूक आयुक्त व प्रादेशिक आयुक्त व प्रादेशिक आयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

(फ) महाराष्ट्र विधानसभेचा अध्यक्ष किंवा विधान परिषदेचा सभापती.

(ग) विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या सचिवालयीन कर्मचारीवर्गापैकी कोणताही कर्मचारी.

महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ चे कलम १०(२) मधील तरतुदीनुसार लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांनी असे प्रत्येक अन्वेषण गुप्ततेने केले पाहिजे आणि विशेषतः तक्रार करणारी व्यक्ती आणि अशा अन्वेषणाचा परिणाम होणारा लोकसेवक यांची नावे, अन्वेषणाच्या पूर्वी, अन्वेषणाच्या काळात किंवा त्यानंतर लोकांना किंवा वृतसंस्थेला कळू देता कामा नये.

परंतु लोक आयुक्तास किंवा उप लोक आयुक्तांस, कारणे लेखी नमूद करून, तसे करणे योग्य वाटल्यास, निर्विवाद सार्वजनिक महत्वाच्या बाबतीत, जाहीर अन्वेषण करता येईल.

उपरोक्तप्रमाणे असेल त्याव्यतिरिक्त, अशा कोणत्याही अन्वेषणाची पध्दत, त्या बाबींच्या परिस्थितीत लोक आयुक्तास किंवा यथास्थिती उप लोक आयुक्तास योग्य वाटेल अशी असेल.

महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १०(४) नुसार लोक आयुक्तास किंवा उप लोक आयुक्तास :--

(अ) तक्रार क्षुल्लक स्वरुपाची किंवा तापदायक आहे किंवा ती सद्भावनापूर्वक केलेली नाही, किंवा

(ब) अन्वेषणास किंवा यथास्थिती अन्वेषण चालू ठेवण्यास पुरेशी कारणे नाहीत, किंवा

(क) तक्रार करणाऱ्यास इतर उपाय उपलब्ध आहेत आणि त्या प्रकरणांच्या परिस्थितीत अशा उपायांचा उपयोग करणे अधिक योग्य आहे, असे वाटल्यास,

स्वेच्छा निर्णयानुसार गाऱ्हाणे किंवा अभिकथन अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तक्रारीचे अन्वेषण करण्यास नकार देता येईल किंवा तिचे अन्वेषण थांबविता येईल.

लोक आयुक्ताने किंवा उप लोक आयुक्ताने एखादी तक्रार स्वीकारावयाची नाही असे ठरविले किंवा तक्रारीच्या संबंधातील कोणतेही अन्वेषण थांबविले तर त्या बाबतीत, त्याने त्याबद्दलची आपली कारणे नमूद केली पाहिजेत आणि ती तक्रार करणाऱ्यास व संबंधीत लोकसेवकास कळविली पाहिजेत.

कोणत्याही कारवाईसंबंधातील या अधिनियमाखालील अन्वेषणाच्या कामकाजामुळे, अशी कारवाई किंवा अन्वेषणाधीन कोणत्याही बाबीसंबंधात पुढील कारवाई करण्याचा कोणत्याही लोकसेवकाचा कोणताही अधिकार किंवा कर्तव्य यावर परिणाम होणार नाही.

या अधिनियमाच्या कलम १५(१) नुसार लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त अन्वेषणाचे काम पार पाडीत असताना त्यांचा कोणत्याही प्रकारे हेतुपूर्वक अपमान करणाऱ्या, किंवा त्यांच्या कामात कोणताही अडथळा आणणाऱ्या

कोणासही अपराधसिध्दीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा साध्या कैदेची किंवा दंडाची किंवा दोहोची शिक्षा दिली जाईल.

या अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार बोललेल्या शब्दाद्वारे किंवा (शब्द) वाचले जावेत या उद्देशाने जो कोणी, लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त यांची दुष्कीर्ती ज्यामुळे होईल असे कोणतेही विधान करील किंवा प्रसिध्द करील किंवा तसे कोणतेही इतर कृत्य करील त्यास, अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यापर्यंत असू शकेल अशा साध्या कैदेची किंवा दंडाची किंवा दोहोची शिक्षा दिली जाईल.

या अधिनियमाच्या कलम १५(३) नुसार फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम १९८-ब च्या तरतुदी या ज्याप्रमाणे उक्त कलम १९८-ब च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपराधांना लागू होतात त्याचप्रमाणे त्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) याखालील अपराधांनाही लागू होतील. मात्र या फेरफाराच्या अधीन, --

(अ) लोक आयुक्ताविरुध्द केलेल्या अपराधाच्या बाबतीत लोक आयुक्ताची पूर्वमंजुरी;

(ब) उप लोक आयुक्ताविरुध्द केलेल्या अपराध्याच्याबाबतीत उप लोक आयुक्ताची पूर्वमंजूरी;

घेतल्याशिवाय सरकारी अभियोक्त्याला अशा अपराधासंबंधी कोणतीही फिर्याद करता येणार नाही.

या अधिनियमानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही कृत्याच्यासंबंधात लोक आयुक्त, उप लोक आयुक्त किंवा कलम १३ मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही अधिकारी, कर्मचारी अभिकरण किंवा व्यक्ती यांच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त यांचे कोणतेही कामकाज औपचारिकतेच्या अभावी गैर धरले जाता कामा नये आणि अधिकारितेच्या कारणावरून असेल त्याव्यतिरिक्त लोक आयुक्ताच्या व उप लोक आयुक्ताच्या कोणत्याही कामकाजाबद्दल किंवा निर्णयाबद्दल आक्षेप घेता येणार नाही, त्याचे पुर्नविलोकन करता येणार नाही किंवा ते रद्द करता येणार नाही वा कोणत्याही न्यायालयात त्याबद्दल हरकत घेता येणार नाही.

१४. **तक्रारी-स्वरुप व आशय** - लोक आयुक्तांकडे केल्या जाणाऱ्या तक्रारी, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ खाली तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त नियम, १९७४ च्या नियम ३ मध्ये नमूद केलेल्या अनुसूची अ' मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे असाव्यात. त्यात पुढील तपशील दिलेला असावा:--

(अ) तक्रारदार व्यक्तीचे नाव आणि पत्ता.

(ब) ज्याचेविरुध्द गाऱ्हाणे किंवा आरोप असेल त्या व्यक्तीचे नाव आणि पत्ता.

(क) ज्या आदेशाविरुध्द तक्रार असेल त्याच्या तारखेपासून बारा महिन्यानंतर गाऱ्हाणे असलेली तक्रार केली असेल, त्याबाबतीत, तक्रारदार व्यक्तीस ज्याविरुध्द तक्रार केली ती कृती ज्या दिवशी माहित झाली असेल ती तारीख आणि त्या तारखेपासून १२ महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर जर तक्रार करण्यात आली असेल तर बारा महिन्यांच्या कालावधीत तक्रार न करणाच्या पुरेशा कारणांचे निवेदन.

सदर तक्रार अर्जात तक्रारदाराने तक्रारीचे स्वरुप विशद करून त्या तक्रारीच्या समर्थनार्थ आवश्यक ती कागदपत्रे तक्रारीसोबत दाखल करावीत.

प्रत्येक तक्रारीवर तक्रारदार व्यक्तीने रीतसर सही करावी. जर तक्रारदार निरक्षर असेल तर दुसऱ्या एखाद्या साक्षर व्यक्तीच्या सहीने साक्षांकित केलेला तक्रारदाराच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा सहीच्या जागी उमटविलेला असावा आणि त्या साक्षर व्यक्तीने स्वतःचे नाव व पत्ता स्वतःच्या सही खाली दिलेला असावा. तक्रारदाराने जितक्या लोकसेवकांच्याविरुध्द तक्रार केलेली असेल तेवढ्या संख्येने जादा प्रती मूळ तक्रारीसोबत जोडलेल्या असाव्यात. तक्रारीसोबत तक्रारदाराने एक शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे. हे शपथपत्र सुस्पष्ट, सुवाच्च आणि शक्य असेल तेथवर ते करून देणाऱ्या व्यक्तीस समजणाऱ्या भाषेत लिहिलेले असले पाहिजे व ते प्रथमपुरुषी भाषेत लिहिलेले असले पाहिजे. शपथपत्र करणाऱ्या व्यक्तीने स्वतःचे नाव, वडिलांचे किंवा पतीचे नाव, आडनाव, वय, व्यवसाय व राहण्याचे ठिकाण नमूद केलेले असावे. शपथपत्र लोक आयुक्त कार्यालयाच्या प्रबंधकासमोर किंवा सहाय्यक प्रबंधकासमोर किंवा योग्य त्या अधिकाऱ्यासमोर साक्षांकित केलेले असावे.

वरील नियमानुसार लोक आयुक्तांकडे करण्यात येणारी तक्रार पुढील नमुन्यात असावी.

**लोक आयुक्त / उप लोक आयुक्त यांचे समक्ष**

**तक्रार क्र.**

**दिनांक :**

**श्री. अ.ब. (नाव व पत्ता इ.)**

**तक्रारदार**

-: **विरुध्द :-**

**श्री. क.ड. (नाव व पत्ता इ.)**

**ज्याच्याविरुध्द तक्रार करण्यात आली तो लोकसेवक-**

यात तक्रारदाराची तक्रार पुढीलप्रमाणे आहे.

(येथे ज्याविरुध्द तक्रार करण्यात आलेली असेल त्या कृत्याचा व गाऱ्हाणे / आरोप यांचा सारांश द्यावा. लांबलचक निवेदने टाळावीत.)

(तक्रार दाखल करण्यास बारा महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाला असेल तर विलंबाची कारणे द्यावीत.)

तक्रारीतील विधानास पुष्टी देणारे यथोचितरित्या करण्यात आलेले शपथपत्र यासोबत दाखल करण्यात आलेले आहे.

दिनांक :

(तक्रारदाराची सही किंवा अंगठा)

**शपथपत्र**

ईश्वरास साक्ष ठेवून मी अशी शपथ घेतो की, हे माझे नाव आणि माझ्या अंगठ्याचा ठसा आहे. आणि या शपथपत्रातील
गांभीर्यपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की सही
मजकूर खरा आहे.

मी पुढे मी अशी शपथ घेतो की, परिच्छेद (येथे क्रमांक द्यावेत) मध्ये जे काही नमूद केले आहे ते माझ्या
(गांभीर्यपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की)
व्यक्तिगत माहितीप्रमाणे खरे आहे आणि ते परिच्छेद (येथे क्रमांक द्यावेत) मध्ये जे काही नमूद केले आहे ते माझ्या माहितीप्रमाणे खरे आहे आणि ते खरे आहे असा माझा समज आहे.

---

१५. **तक्रारींवर केली जाणारी कार्यवाही** - लोक आयुक्तांची संस्था अल्पखर्चात अनौपचारिक आणि तांत्रिक गुंतागुंत नसलेला उपाय देते. संस्थेच्या गाऱ्हाणे निवारण करण्याच्या प्रक्रियेला पीडित व्यक्ती आपली लेखी तक्रार हाती किंवा पोस्टाने या कार्यालयाकडे पाठवून चालना देऊ शकते. त्याच्या तक्रारीची अत्यंत काळजीपूर्वक व सहानुभूतीपूर्वक तपासणी करण्यात येते आणि योग्य प्रकरणी काटेकोरपणे आणि परिपूर्णत्वेने अन्वेषण करण्यात येते. तक्रारीतील कृती करणे किंवा न करणे याबाबतची कार्यवाही ही अवास्तव आहे किंवा स्वेच्छेनुसार केलेली आहे किंवा कसे हे संपूर्णतः वस्तुनिष्ठतेने निश्चित केले जाते. तसेच निर्णय घेण्याची प्रक्रिया ही न्याय्य होती किंवा कसे आणि अन्य अनेक गोष्टींमधून सर्व संबंधित बाबी विचारात घेतल्या होत्या किंवा कसे याकडे आमचे विशेष लक्ष असते.

तक्रारीचे अन्वेषण करताना तांत्रिक गोष्टींचा अडथळा येणार नाही याबाबत सतत जागरुक राहण्याचा प्रयत्न केला जातो. शक्यतोवर प्रकरण योग्य नमुन्याअभावी किंवा कोणत्याही तांत्रिक गोष्टीमुळे बंद केले जात नाही. बहुसंख्येय तक्रारदार हे गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना परत न पाठवता त्यांची तक्रार योग्यरित्या सादर करण्यास त्यांना मदत करण्यात येते.

या कार्यालयास प्राप्त होणारी तक्रार काळजीपूर्वक वाचली जाते व संबंधित मुद्दे वेगळे काढले जातात. त्यानंतर तक्रारदाराचे नाव व त्याच्या व्यक्तित्वाची ओळख शंकास्पद वाटल्यास, विशेषतः लोकसेवकाविरुध्द भ्रष्टाचाराचे आणि गैरव्यवहाराचे अभिकथन असलेल्या प्रकरणांमध्ये, तक्रारदाराने दिलेल्या पत्त्यावर त्याला पत्र पाठवून त्याच्या तक्रारीतील मजकुराबाबत त्याच्याकडून खात्री करून घेतली जाते.

तक्रारींची काटेकोरपणे तपासणी केल्यानंतर तक्रार दाखल करून घेणे किंवा नाकारणे याबाबतचा निर्णय घेतला जातो. जी प्रकरणे पाठपुरावा करण्यायोग्य नाहीत म्हणून नाकारण्यात येतात, त्याबाबत त्या तक्रारदारास कारणांसह कळविले जाते.

ज्या तक्रारी दाखल करून घेतल्या जातात त्या तक्रारींच्या स्वरुपानुसार ज्या लोकसेवकांविरुध्द तक्रार आहे त्यांच्याकडून त्यांची बाजू समजून घेण्यासाठी किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तक्रार अर्जावर अहवाल मागविले जातात. बहुतांश तक्रारींमध्ये तक्रारदाराच्या गाऱ्हाण्याचे निवारण नियमित अन्वेषणास प्रारंभ न करता केवळ पत्रव्यवहाराने पाठपुरावा करून होते. त्यांच्याकडून प्राप्त झालेले अहवाल असमाधानकारक किंवा अपुरे वाटल्यास अशी प्रकरणे लोक आयुक्त / उप लोक आयुक्त यांच्यापुढे सुनावणीस ठेवण्यात येतात आणि अशा रितीने संबंधित अधिकारी व तक्रारदार यांना एकत्र आणून

चर्चेद्वारे गाऱ्हाण्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो; आणि अशाप्रकारे बहुतांश प्रकरणात तक्रारदाराच्या गाऱ्हाण्याचे निवारण करण्यात येते. परंतु, तक्रारदारावर खरोखर अन्याय झाला असून प्रशासन त्याकडे आवश्यक लक्ष देत नाही किंवा भ्रष्टाचार झाला असल्याचे दिसून आल्यास त्या प्रकरणी महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १० मधील तरतुदीनुसार अन्वेषण करण्यात येते. अशा प्रकरणांमध्ये सबंधीत लोकसेवकाला नोटीस बजावून आणि त्याची प्रत सक्षम प्राधिकाऱ्यास पाठवून अन्वेषण पुढे चालू ठेवले जाते. अन्वेषणानंतर त्या प्रकरणात कुप्रशासन / भ्रष्टाचार दिसून आल्यास अन्वेषणाचे निष्कर्ष आणि शिफारशी कलम १२(१) किंवा १२(३) नुसार सक्षम प्राधिकाऱ्यास कळविल्या जातात. त्या शिफारशीनुसार तक्रारदाराच्या गाऱ्हाण्याच्या निवारणार्थ आवश्यक ती कार्यवाही करून आणि कुप्रशासन / भ्रष्टाचारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक शिक्षात्मक कारवाई करून आपला पूर्तता अहवाल लोक आयुक्त / उप लोक आयुक्त यांना सक्षम प्राधिकाऱ्याने कलम १२(२) किंवा १२(४) नुसार विहित मुदतीत सादर करणे आवश्यक असते.

लोक आयुक्त / उप लोक आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीवर किंवा निष्कर्षावर सक्षम प्राधिकाऱ्यांनी केलेली कारवाई समाधानकारक आहे अशी लोक आयुक्तांची किंवा उप लोक आयुक्तांची खात्री पटली तर ते प्रकरण समाप्त केले जाते व संबंधित लोकसेवक, प्राधिकारी व तक्रारदार यांस त्याप्रमाणे कळविण्यात येते. परंतु, त्यांचे समाधान झाले नाही तर आवश्यक वाटल्यास त्या प्रकरणाचा विशेष अहवाल कलम १२(५) मधील तरतुदीनुसार माननीय राज्यपालांना पाठविण्यात येतो व त्यानुसार सबंधित तक्रारदारास कळविण्यात येते. असा विशेष अहवाल स्पष्टीकरणात्मक निवेदनासह राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था माननीय राज्यपालांकडून केली जाते.

तक्रारदारावर अन्याय झाला आहे असे चौकशीमध्ये आढळल्यास तो अन्याय दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात. तसेच प्रशासकीय कार्यवाही किंवा प्रथा दोषपूर्ण असल्याचे आढळून आल्यास त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारशी केल्या जातात. लोकसेवकाविरुध्द आरोप सिध्द झाल्यास त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याची शिफारस केली जाते.

१६. लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांच्याकडे अशा बऱ्याच तक्रारी येतात की, ज्यासंबंधात चौकशी करण्याचे अधिकार महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ नुसार त्यांना नसतात. तसेच काही तक्रारी अत्यंत अस्पष्ट किंवा मोघम स्वरुपाच्या असतात, तर काही तक्रारी या इतरत्र केलेल्या पत्रव्यवहाराच्या अस्पष्ट झेरॉक्स प्रती असतात. अर्थात, अशा तक्रारींची दखल घेणे अशक्य असते.

अनेक तक्रारदारांची अशी एक गैरसमजूत आहे की, लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्तांकडे तक्रार केल्यावर कोर्टाप्रमाणे बंधनकारक निर्णय किंवा हुकूम दिले जाऊ शकतात. त्यामुळे ठराविक पदावर नेमणूक करावी, नुकसानभरपाई द्यावी, बदली आदेश रद्द करावेत, पदोन्नती द्यावी, विभागीय चौकशीचे आदेश रद्द करावेत, नोकरी मिळवून द्यावी अशा विनंतीयुक्त तक्रारी पाठविण्यात येतात. लोकांनी हे लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे की, लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त हे कोर्टाप्रमाणे बंधनकारक आदेश देऊ शकत नाहीत. तक्रार आल्यावर तिचे निवारण करण्याचे सर्व प्रयत्न अनौपचारिकपणे करण्यात येतात. पण त्यात यश न मिळाल्यास आणि अन्वेषणानंतर जर तक्रारदारावर अन्याय झाला आहे किंवा त्याला अकारण त्रास होत आहे अशी खात्री पटली तर पुढील कारवाई वरील परिच्छेद १५ मध्ये विशद केल्याप्रमाणे होते. तसेच, अधिनियमाने निर्देश केलेली कार्यपध्दती अवलंबणे आवश्यक असल्याने कोणताही निर्णय ताबोडतोब देणे नेहमीच शक्य नसते. संपूर्ण महाराष्ट्रामधून जवळ जवळ ११ ते १२ हजार तक्रारी दरवर्षी या संस्थेकडे येतात.

साहजिकच प्रत्येक तक्रारीचे काळजीपूर्वक अवलोकन करून पुढील सर्व कार्यवाही करण्यात काही वेळ जाणे अपरिहार्य आहे.

प्रत्येक तक्रार कमीत कमी वेळेमध्ये निपटून काढण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करीत असलो तरीही वर नमूद केलेल्या कारणांमुळे ते नेहमीच शक्य नसते. आपल्या तक्रारीचा पाठपुरावा करण्याकरीता तक्रारदार वारंवार या कार्यालयाला पत्रे लिहून त्याच त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा सांगत असतात किंवा एक तक्रार दाखल झाल्यावर त्यानंतर क्रमाक्रमाने इतर तक्रारींबाबत पत्रे लिहित जातात. या बाबी तक्रारदारांनी निक्षून टाळाव्यात. त्यामुळे या कार्यालयातील कर्मचारी वर्गाचा बराच निष्फळ जाणारा वेळ वाचू शकेल. तसेच, तक्रारदारांशी सतत पत्रव्यवहार करणे आणि त्याला त्याच्या तक्रारीसंबंधातील प्रगती सदोदित कळवीत राहणे केवळ अशक्य आहे, असे नव्हे तर अनावश्यकसुध्दा आहे. त्यामुळे तक्रारदारांनी असा अनावश्यक पत्रव्यवहार टाळल्यास सर्व तक्रारींचे लवकर परिमार्जन होण्याकरिता मदतच होऊ शकेल.

ही संस्था अनेक तक्रारदारांची गाऱ्हाणी दूर करण्यात यशस्वी ठरली आहे. आमचा असा अनुभव आहे की, मागील काही वर्षांत चौकशीसाठी हाती घेण्यात आलेल्या एकूण तक्रारींपैकी ६० ते ७० टक्के प्रकरणांमधील गाऱ्हाणी दूर करण्यात आलेली आहेत.

**कार्यालयाचा पत्ता :**

**लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**नवीन प्रशासन भवन, पहिला मजला,**
**मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,**
**मुंबई-४०० ०३२.**

**दूरध्वनी क्रमांक २२०२ ४५४० / २२८५ २९०१ / २२८२ ४३५८ / २२८३ ५६००**

**फॅक्स क्रमांक २२०२ ४५४०**